# हमीपत्र

आम्ही मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना या सोसायटी / ट्रस्टचे अध्यक्ष, सचिव अनुक्रमे श्री. अॅड. अंकुशराव टोपे व श्री. राजेश अंकुशराव टोपे तसेच मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, नागेवाडी, जालना या संस्थेचे प्राचार्य, संचालक प्रा. आर.एल. करवंदे खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतात की,

1. संस्थेमध्ये सुरु असलेल्या सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांची माहिती संस्थेच्या www.msscetjalna.org या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात आली आहे. सदर माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द् माहितीनुसार बरोबर असून त्यात कोणतीही तफावत नाही.
2. संस्थेमध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या वेळी प्रसिध्द् केलेल्या संस्थेच्या माहितीपुस्तीकेत खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

   अ) संस्थेमध्ये मान्यताप्राप्त अभ्यासक्रम आणि प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता.

   ब) प्रत्येक अभ्यासक्रमासाठी परिषदेच्या निकषाप्रमाणे मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती पदधारकांची नांवे, त्यांची शैक्षणिक अर्हता आणि अभ्यासक्रमनिहाय फी इत्यादी.

   क) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार संस्थामध्ये तक्रारनिवारण अधिकारी यांची नियुक्ती केली असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली असून www.msscetjalna.org/uploads/grievanceredressal.pdf - या लिंकवर उपलब्ध आहे.

   ड) अॅंटी रॅगींग व अॅंटी कॅपीटेशन फी अॅक्टच्या तरतूदी संस्थेस बंधनकारक असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तीकेत व संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली असून www.msscetjalna.org/uploads/anti-ragging and anti-capitation.pdf या लिंकवर उपलब्ध आहे.

   इ) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार (विशाखा जजमेंट) शैक्षणिक संस्थामध्ये होणा-या मुलींच्या छेडछाडीवर प्रतिबंध करण्याकरीता संस्थामध्ये महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तीकेत व संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली असून www.msscetjalna.org/uploads/ladies-grievance.pdf या लिंकवर उपलब्ध आहे.

फ) संस्थेत अपंगांसाठी रॅम्प व त्यांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आलेली आहे.
ग) अग्नि प्रतिबंधक कायद्यानुसार संस्थेत आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात आलेली आहे.
ह) संस्थेत सिगारेट/तंबाखू आणि इतर अंमली पदार्थांच्या सेवनापासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याकरीता जागृती व तद्अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
न) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुविद्या परिषद व कौन्सिल ऑफ फार्मसी यांच्या विहित मानका व प्रमाणकानुसार संस्थेमध्ये आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

वरील माहिती आमच्या माहितीनुसार बरोबर असून त्यात कोणतीही तफावत नाही. भविष्यात माहितीमध्ये तफावत किंवा ख़ोटी असल्याचे आढळल्यास त्यास सर्वस्वी आम्ही जबाबदार राहू.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | प्राचार्य |
| ॲड. अंकुशराव टोपे | प्रा. आर.एल.करवंदे |